सो.म.न.पा. फॉर्म नं. २२/२०,०००/२००४-०५

तारेचा पत्ता "महानगरपालिका"

टेलिफोन नंबर -२७४०३३१
ते २७४०३३८ (पी.बी.एक्स)

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

इंद्रभुवन :- पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३ ००१.

## जाहिरप्रसिध्दीकरण

सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्लॅस्टिक कॅरीबॅग उत्पादक, साठवणूक, वितरक, विक्री व हाताळणी व्यावसायिक व नागरिकांना या जाहिर प्रसिध्दिकरणाद्वारे कळविण्यात येते की, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व नियम -२०१६ अंतर्गत ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे सर्व प्रकारचे प्लॅस्टिक कॅरीबॅग, पिशव्या, पाऊच इ. वर पुर्णतः बंदी घालण्यास आलेली आहे तसेच ५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या कॅरीबॅग उत्पादन, साठवणूक, वितरण, विक्री व हाताळणी व्यावसायिकांनी सो.म.पा. कडे नोंदणी करणे नमुद कायद्यांतर्गत बंधनकारक आहे.

१) नमुद कायद्यातील तरतुदी अन्वये ५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या प्लस्टिक कॅरीबॅग, पिशव्या, पाऊचसाठा इ. विक्री, उत्पादन, वितरण व हाताळणी करणा-या व्यावसायिकांची दरमहा ४०००/- रू.प्रमाणे वार्षिक नोंदणी ४८०००/- सो.म.पा. कडे भरून नोंदणी करणे अनिवार्य आहे.

२) नोंदणी प्रमाणपत्राचा कालावधी हा आर्थिक वर्षाप्रमाणे एप्रिल ते मार्च असा राहिल. प्रमाणपत्राचे नुतनीकरण करणे हे मार्च महिन्यात करणेत येईल. नोंदणी करीताचा विहित नमुन्यातील फॉर्म सो.म.पा. च्या आरोग्य खाते अन्न व परवाना विभाग, प्रशासकीय इमारत, तिसरा मजला येथे उपलब्ध आहे.

३) प्लॅस्टिक कॅरीबॅग, पाऊच, पिशवी इ. उत्पादन विक्री, साठा, वितरण व हाताळणी करना-या व्यवसायिकांनी नमुद उत्पादित प्लॅस्टिकवर महाराष्ट्र प्रदुषण मंडाळाकडून घेतलेल्या नोंदणी प्रमाणपत्राचा मजकूर छापणे अनिवार्य आहे.

४) ५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीचे प्लॅस्टिक कॅरीबॅग, पिशवी ग्राहकांना देताना व्यवसायिकांनी ती पिशवी मोफत देऊ नये. तसेच सदर प्लॅस्टिक कॅरीबॅगच्या किंमतीसह दर्शणी भागावर फलक लावावा.

५) खाद्यपदार्थ उत्पादक व विक्रेते व्यावसायिकांनी रंगीत (उदा. काळा, गुलाबी, निळा,पिवळा इ.) प्लॅस्टिक कॅरीबॅग मधून खाद्यपदार्थ वितरीत करू नये. रंगीत प्लॅस्टिकच्या रासायनिक अभिक्रियेमुळे खाद्यपदार्थ दुषित होतात.

६) गुटखा, तंबाकुयुक्त पानमसाला इ. ची बांधणी/विक्री करताना कोणत्याही स्वरूपात प्लॅस्टिकचा वापर करू नये.

कमी जाडीच्या प्लॅस्टिक कॅरीबॅग, पाऊच, पिशवी इ. चा वापर केल्याने त्याचे विघटण होत नसल्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. तसेच अशा कॅरीबॅग,पाऊच इ. हे नाले, ड्रेनेज पाईप इ. ठिकाणी अडकल्याने पाणी तुंबुन आनारोग्यकारक परिस्थिती निर्माण होते. त्याच प्रमाणे उघड्यावर टाकलेले प्लॅस्टिक कॅरीबॅग हे जनावरे खातात, त्याचा त्याच्या आरोग्यावर दुष्परीणाम होत आहे,व अनेक गायी यामुळे मरण पावल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी पर्यावरण संरक्षणाकरीता उपरोक्त नमुद कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी शहरातील व्यावसायिक, ग्राहक, नागरीक इ. नी करावी. अन्यथा कठोर कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी. याबाबत शहरातील सर्व संबंधितांनी काटेकोर पालन करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

जाक्र.१/आ.अ/अपवि/९४७
आरोग्याधिकारी यांचे कार्यालय
दि. १७/११/२०१७